अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपिल क्र. १६/२०१९
जा.क्र उआ (सा.प्र.)/ ३६५२ दि. २३/०८/२०१९

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/१६/२०१९

**श्री सुरेश लक्ष्मण चौगुले**
फ्लॅट नं. ६, शिवनेरी सोसायटी, महेश पार्क,
तुळीज रोड, नालासोपारा (पू) ४०१२०९
------------------ अपिलार्थी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी
तथा प्रशासन अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

श्री सुरेश लक्ष्मण चौगुले रा. फ्लॅट नं. ६, शिवनेरी सोसायटी, महेश पार्क, तुळीज रोड, नालासोपारा (पू) ४०१२०९ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. १३.०६.२०१९ रोजी अर्ज करून "सन २०१३ ते आजपर्यंत आपल्या कार्यालयात कार्यरत असलेल्या सर्व कर्मचारी, अधिकारी यांची नावे हुद्दा याची माहिती देऊन बदल्यांच्या कायद्यानुसार ३ वर्षापेक्षा कोणते कर्मचारी, अधिकारी कार्यरत आहेत यांची नावे व कोणाच्या बदल्या होणे प्रलंबित आहे याची माहिती देऊन बदल्यांच्या कायद्याचे परिपत्रक द्यावे." याबाबत माहिती मागितलेली होती.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/२५८० दि. ०६.०७.२०१९ व जा. क्र. जमाअ/आस्था/२७१३ दि. १२.०७.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| १३.०६.२०१९ | १३.०६.२०१९ | १२.०७.२०१९ | ०६.०७.२०१९<br>१२.०७.२०१९ | - |

अपिलार्थी यांनी "आजपर्यंत काहीही माहिती मिळाली नाही." असे नमूद करून अपील क्र. १६/२०१९ चा अपील अर्ज दि. २३.०७.२०१९ रोजी दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| १९.०७.२०१९ | २३.०७.२०१९ | ०५.०८.२०१९ | होय | - |

सदर प्रकरणी दि. ०९.०८.२०१९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री सुरेश लक्ष्मण चौगुले रा. फ्लॅट नं. ६, शिवनेरी सोसायटी, महेश पार्क, तुळीज रोड, नालासोपारा (पू) ४०१२०९ हे उपस्थित नव्हते. श्री चेतन कबाडे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा हे उपस्थित होते.

विवेचन

श्री चेतन कबाडे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/२५८० दि. ०६.०७.२०१९ व जा. क्र. जमाअ/आस्था/२७१३ दि. १२.०७.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे. असे प्रतिपादन केले.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी अपिलार्थी श्री सुरेश लक्ष्मण चौगुले रा. फ्लॅट नं. ६, शिवनेरी सोसायटी, महेश पार्क, तुळीज रोड, नालासोपारा (पू) ४०१२०९ यांचे माहिती अर्जास उत्तर दिलेले आहे सबब अपील क्र. १६/२०१९ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका